# प्रकरण - चार

## मातृभाषा मराठीच्या पाठयपुस्तकांचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून केलेले विश्लेषण

# प्र क र ण ४ थे

## " मातृभाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून केलेले विश्लेषण "


४.१ प्रस्तावना.

४.२ "बालभारती पाठ्यपुस्तक पहिले" या पाठ्यपुस्तकाचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण.

४.३ "बालभारती पाठ्यपुस्तक दुसरे" या पाठ्यपुस्तकाचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण.

४.४ "बालभारती पाठ्यपुस्तक तिसरे" या पाठ्यपुस्तकाचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण.

४.५ "बालभारती पाठ्यपुस्तक चौथे" या पाठ्यपुस्तकाचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण.

४.६ समारोप.

# प्रकरण ४ थे

## " मातृभाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून केलेले विश्लेषण "

### ४·१ प्रस्तावना :

प्रस्तुत शोध प्रबंधाचा विषय " प्राथमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा मूल्य शिक्षणाच्या संदर्भात चिकित्सात्मक अभ्यास असा असल्यामुळे या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकातून कोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात याचा शोध घेणे अत्यावश्यक वाटल्यामुळे प्रस्तुत प्रकरणाचा समावेश करण्यात आलेला आहे· पाठयपुस्तकातून शोधून काढलेल्या मूल्यांच्या पार्श्वभूमीवर ही मूल्ये किती प्रमाणात मुलांमध्ये संक्रमित होतात त्याचा पडताळा घेणे सोपे जाईल असा विश्वास वाटतो·

प्रस्तुत प्रकरणामध्ये पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांनी तयार केलेल्या "बालभारती मराठी पुस्तक पहिले ते चौथे" या पाठयपुस्तकांतील पाठांमधून कोणकोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे· प्रत्येक पाठाचा आशय, त्याची उद्दिष्टे व त्या द्वारे कोणते संस्कार विद्यार्थ्यांवर होवू शकतील याचा विचार करुनच प्रत्येक पाठातील मूल्ये निश्चित केलेली आहेत· ही मूल्ये निश्चिती करतांना पाठातून प्रभावीपणे जाणवणाऱ्या मूल्यांनाच प्रमुख मूल्य मानले आहे, व त्या प्रमुख मूल्याबरोबरच दुसरी कांही मूल्ये प्रतिबिंबित होत असतील तर अशाही मूल्यांचा विचार केलेला आहे·

पाठयपुस्तकांतील पाठांमधून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचा विचार करतांना प्रथम प्रत्येक पाठातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये निर्धारित करुन त्यानंतर त्या त्या पाठाचे नाव व त्यापुढे ती मूल्ये नमूद केली आहेत· त्यानंतर कांही पाठांमध्ये समान मूल्ये आढळल्यामुळे मूल्यानुसार त्या पाठांचे परत एकदा वर्गीकरण केले· उदाहरणार्थ "वृक्षसंवर्धन" हे मूल्य " पाहुणा गोजिरा ", " झाडाची माया ";

" आभाळाचा निरोप ", " ऋतुराजाची चाहूल ", " इथे " या पाँच पाठांत आढळून येते. त्यामुळे मूल्याच्या दृष्टिकोनातून हे पाठ एकाच वर्गात नमूद केले आहेत.

इयत्ता १ ली व इयत्ता २ री च्या पाठ्यपुस्तकामध्ये गाणी हा स्वतंत्र विभाग आहे. त्यामध्ये प्रत्येक इयत्तेसाठी तीन तीन गाणी योजलेली आहेत. या गाण्यांचा उद्देश मूल्य संक्रमन नसून भाषा तोंडात बसावी आणि मनोरंजन व्हावे हा असल्यामुळे त्यांचा विचार केलेला नाही.

संशोधकाने या पाठ्यपुस्तकांचा सूक्ष्म अभ्यास करुन तसेच ही पाठ्यपुस्तके शिकविणा-या कांही अध्यापकांशी चर्चा करुन प्रत्येक पाठांमधून कोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात त्यांची पाठनिहाय यादी केली. त्यानंतर प्रश्नावली बरोबरच ही पाठनिहाय मूल्यांची यादी या वर्गांना शिकविणा-या शिक्षकांना देण्यात आली आणि त्या त्या पाठासमोर नमूद केलेल्या मूल्यांखेरीज आणखी कांही मूल्ये आढळून येत असल्यास त्या त्या पाठासमोर त्यांची नोंद करण्यास सांगीतले.

मूल्यांच्या दृष्टिकोनातून पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण करतांना प्रत्येक इयत्तेचा स्वतंत्रपणे विचार एक स्वतंत्र विभाग कल्पून केलेला आहे. तो पुढील प्रमाणे आहे.

## ४.२ "बालभारती पाठ्यपुस्तक पहिले" या पाठ्यपुस्तकाने मूल्यांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण :

इयत्ता १ ली च्या " बालभारती पुस्तक १ ले " या पाठ्यपुस्तकातील पहिले १ ते १६ हे पाठ मूळाक्षरे घटविण्यावर आधारित आहेत. त्यामध्ये अर्थपूर्ण शब्द व वाक्यांद्वारे मूळाक्षरे घटविण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. सोळाव्या पाठांनंतर संपूर्ण मूळाक्षरे म्हणजे स्वर व व्यंजने यांची क्रमबद्द रीतीने मांडणी केलेली आहे. यास " अक्षर ओळख " असे नाव दिलेले आहे.

पाठ क्रमांक १७ पासून पुढे बाराखडीवर आधारित पाठ लिहिलेले आहेत. यामध्ये काना, पहिली वेलांटी, दुसरी वेलांटी, दोन्ही उकार, दोन्ही मात्रा, नंतर काना, मात्रा व अनुस्वार यावर आधारित प्रत्येकी एक एक पाठ आहे. असे क्रमांक १७ ते २६ एकूण दहा पाठ आहेत. पाठ क्रमांक २७ हा वाचा-बोला-लिहा असा आहे. यामध्ये विविध शब्दांचे गट तयार केलेले आहेत. पहिल्या गटात नाती दिलेली आहेत. दुसऱ्या गटात पतंगाशी संबंधित माहिती आहे. तिसऱ्या गटात नदी, पाणी आणणे या संबंधी माहिती दिलेली आहे. ४ थ्या गटामध्ये शाळेतील अत्यावश्यक साहित्याची नावे दिलेली आहेत. पाचव्या गटात वहातुकीची साधने दिलेली आहेत. सहाव्या गटात दुकानदार, व त्या संबंधी शब्द आहेत. या पाठानंतर मुलांना बाराखडीचे पूर्ण ज्ञान देण्याबाबत माहिती दिलेली आहे.

अशा तऱ्हेने या पुस्तकातील पाठ क्रमांक १ ते २७ हे अक्षर ओळख व बाराखडीचा परिचय यासाठी आहेत.

पाठ क्र.२८ चे पुढे बाराखडीवर आधारित आशययुक्त पाठ आहेत. या पाठांमधून खालील प्रमाणे मूल्ये प्रतिबिंबित झालेली आहेत. ती खालील सारणी क्रमांक ४.१ मध्ये दिलेली आहेत.

<u>सारणी क्रमांक ४.१</u>

इयत्ता १ ली च्या पाठ्यपुस्तकातील पाठातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये

| अ.नं. | पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|---|
| १. | २८ | दिवाळी आली | आनंदवृध्दी सणांची माहिती. |
| २. | २९ | पोपट | पक्षांवर प्रेम करणे. |
| ३. | ३० | मनीमाऊ | उपयोगीता / उपयुक्तता. |
| ४. | ३१ | फुगेवाला | निर्भेळ आनंदप्राप्ती. |

सारणी क्र.४.१ पुढे चालू.

| अ.नं. | पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|---|
| ५. | ३२ | फुलपाखरु | सौंदर्याची जोपासना, आनंदप्राप्ती |
| ६. | ३३ | खारुताई | परिसरातील प्राण्याची माहिती |
| ७. | ३४ | गांधीजी | प्रार्थनेचे महत्व. |
| ८. | ३५ | बाहुली | शहाणपणा. |
| ९. | ३६ | पेरुची फोड | सर्वांनी वाटुन खावे, फुकटचे खावू नये, शहाणपणा. |
| १०. | ३७ | मी कोण ? | कष्टाळूवृत्ती, परोपकार. |
| ११. | ३८ | माझा घोडा | मनोरंजन |
| १२. | ३९ | घडयाळबाबा | वेळेचे महत्व. |
| १३. | ४० | एक रविवार असा आला | सहकार्य, आनंदप्राप्ती, प्रेमळपणा. |

वरील सारणी क्रमांक ४.१ नुसार पाठांमधून मूल्ये प्रतिबिंबित होतात. या मूल्यांचे निरीक्षण केले असता कांही पाठांमधून कांही समान मूल्येच आढळतात. म्हणून अशा मूल्यानुसार पाठांची रचना खालील सारणी क्रमांक ४.२ मध्ये केलेली आहे.

सारणी क्रमांक ४.२

मूल्यावर आधारित केलेले पाठांचे वर्गीकरण

| अ.नं. | मूल्याचे नाव | प्रतिबिंबित असणारे पाठ |
|---|---|---|
| १. | आनंदवृध्दी, आनंदप्राप्ती, मनोरंजन | दिवाळी आली, फुलपाखरु, फुगेवाला, माझा घोडा, एक रविवार असा आला |

सारणी क्र॰ ४॰२ पुढे चालू॰

| अ॰नं॰ | मूल्याचे नाव | प्रतिबिंबित असणारे पाठ |
|---|---|---|
| २॰ | संस्कृती संवर्धन | दिवाळी आली॰ |
| ३॰ | उपयोगीता | मनीमाऊ |
| ४॰ | पक्षावर प्रेम करणे | पोपट |
| ५॰ | सौंदर्याची जोपासना | फुलपाखरु |
| ६॰ | परिसरातील प्राण्यांची माहिती (परिसर मूल्य) | खारुताई |
| ७॰ | प्रार्थनेचे महत्व | गांधीजी |
| ८॰ | शहाणपणा | बाहुली, पेरुची फोड |
| ९॰ | कष्टाळूवृत्ती | मी कोण, पेरुची फोड |
| १०॰ | परोपकार | मी कोण, पेरुची फोड |
| ११॰ | सहकार्य | एक रविवार असा आला |
| १२॰ | वेळेचे महत्व | घड्याळबाबा |

वरील प्रमाणे मूल्यांनुसार पाठांची विभागणी केलेली आहे॰ या पाठ्यपुस्तकातील पाठांमधून वरील प्रमाणे एकूण बारा मूल्ये प्रतिबिंबित होतात असे आढळते॰आहे॰ सर्व पाठांच्या चिकित्सक पाहणीवरुन प्रामुख्याने आनंदप्राप्ती, मनोरंजन अथवा आनंदवृध्दी या मूल्यांवरच अधिक भर दिल्याचे आढळते॰ या मूल्यांवर आधारित पांच पाठ आढळून आले॰

याच बरोबर परिसर, प्राणी, पक्षी, या बद्दलची माहिती, उपयोग व त्याबाबतचे प्रेम वाढवण्याचे दृष्टीने अशा मूल्यांवर आधारित असे पोपट, मनीमाऊ, फुलपाखरु असे पाठ आहेत॰

कष्टाळूवृत्ती, शहाणपणा, परोपकार, सहकार्य इत्यादी मूल्यांवर आधारित पेरुची फोड, बाहुली, मी कोण १ एक रविवार असा आला हे पाठ आढळले॰

वेळेचे महत्व, सर्पाची माहिती, प्रार्थनेचे महत्व, सौंदर्यजोपासना ही मूल्ये जोपासनेचे दृष्टीने घड्याळबाबा, दिवाळी आली, गांधीजी, फुलपाखरु हे पाठ आढळून आले.

वरील विवेचनावरुन इयत्ता १ लीच्या बालभारती पुस्तक पहिले या पाठ्यपुस्तकातील पाठ क्रमांक २८ ते ४० या एकूण १३ पाठामधून वरील प्रमाणे एकूण १२ मूल्ये प्रतिबिंबित होतात असे आढळून आले.

या मूल्यांमध्ये प्रामुख्याने मनोरंजन व आनंदप्राप्ती ही दोन मूल्ये प्रामुख्याने बहुसंख्य म्हणजे पांच पाठामधून प्रतिबिंबित होतात.

## ४.३ " बालभारती पाठ्यपुस्तक दुसरे " या पाठ्यपुस्तकाचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण :

इयत्ता २ री च्या 'बालभारती पुस्तक दुसरे' या पाठ्यपुस्तकात एकूण २९ पाठ आहेत. या २९ पाठापैकी नऊ पद्यपाठ व एक नाटय आहे. या २९ पाठामधून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचा शोध घेतांना खालील प्रमाणे प्रत्येक पाठामधून मूल्ये प्रतिबिंबित होतात असे आढळून आले आहे.

सारणी क्रमांक ४.३

ठ इयत्ता २ री पाठ्यपुस्तकातील पाठातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये

| अ.नं. | पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|---|
| १. | १ | शाळेचा पहिला दिवस | सहका-याबद्दल प्रेम, बंधुभाव. |
| २. | २ | आनंदाने गाऊ या | निसर्गप्रेम. |
| ३. | ३ | आमचे सोबती | भूतदया |
| ४. | ४ | हुषार कावळा | प्रसंगावधान, युक्ती श्रेष्ठ |

सारणी क्रमांक ४·३ पुढे चालू ···

| अ·नं· | पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|---|
| ५· | ५ | इंजिनदादा | वाहन प्रेम, यंत्राबद्दल आवड |
| ६· | ६ | माकडाचे घर | स्वावलंबन, कष्टाचे महत्व· |
| ७· | ७ | मला शाबासकी नको | प्रामाणिकपणा,साहस, राष्ट्रीय नेत्याबद्दल आदर· |
| ८· | ८ | सांग ना आई | जिज्ञासा, चौकस वृत्ती· |
| ९· | ९ | मित्रप्रेम | शेजारधर्म, बंधुभाव· |
| १०· | १० | ऐकावे तरी कोणाचे ? | विनोद, सारासार विचार |
| ११· | ११ | विदूषक | विनोद, मनोरंजन |
| १२· | १२ | गोगलबाई बारशाला जातात· | प्राणी जीवनाबद्दल जिव्हाळा, विनोद, घरगुती समारंभ |
| १३· | १३ | माझा खावू मला द्या | स्वच्छता, श्रमदान |
| १४· | १४ | पाहुणे | घरगुती समारंभ, नाती स्पष्ट करणे· |
| १५· | १५ | आईस पत्र | कौटुंबिक, सामाजिक शिष्टाचार |
| १६· | १६ | सुगीचे दिवस | ग्रामीण जीवन परिचय, निसर्ग परिचय |
| १७· | १७ | उघड पावसा | निसर्ग परिचय, प्राणी पक्षी माहिती |
| १८· | १८ | कुंभाराची कला | सामाजिक बांधिलकी, व्यवसाय आवड |
| १९· | १९ | पुरी हौस फिटली | विनोद , चातुर्य |
| २०· | २० | चल ग सई | निसर्ग प्रेम· |
| २१· | २१ | एकीचे बळ | अन्याया विरुध्द प्रतिकार, एकता, सहकार्य· |
| २२· | २२ | वाफेची शक्ती | संशोधकाबद्दल आदर, विज्ञानाबद्दल आवड, वैज्ञानिक दृष्टीकोन |
| २३· | २३ | अशी आमुची मुले | बंधुभाव, जिव्हाळा, सहकार्य |

सारणी क्रमांक ४·३ पुढे चालू ···

| अ·नं· | पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|---|
| २४· | २४ | धाडसी फेलिसिटा | साहस, प्रसंगावधान, संकटग्रस्ताना मदत करणे, शौर्य· |
| २५· | २५ | हंस कोणाचा ? | सहानुभूती , जीवदान |
| २६· | २६ | इच्छा | इच्छाशक्ती, कल्पनाशक्ती विकास |
| २७· | २७ | देह अपंग मन अभंग | अपंगाबद्दल प्रेम, सहानुभूती· |
| २८· | २८ | कोणासाठी ? बाळासाठी | मातृप्रेम, साहस |
| २९· | २९ | गाडगेबाबा | स्वच्छता, समाजसेवा, श्रमप्रतिष्ठा |

वरील सारणी क्रमांक ४·३ नुसार प्रत्येक पाठांमधून मूल्ये प्रतिबिंबित होतात असे आढळून आले· या मध्ये कांही पाठामधून एकापेक्षा अनेक मूल्ये प्रतिबिंबित झालेली आढळतात· तसेच एक मूल्य अनेक पाठात आलेले आहे असे दिसते· यासाठी मूल्यांच्या नेमक्या निश्चिततेसाठी मूल्यांवर आधारित अशी पाठांची यादी खालील प्रमाणे केली आहे· वरील यादीमध्ये प्रत्येक पाठातील मूल्ये आहेत· तर खाली मूल्यानुसार पाठांची नांवे दिलेली आहेत·

## सारणी क्रमांक ४·४

## मूल्यांवर आधारित केलेले पाठांचे वर्गीकरण

| अ·नं· | मूल्याचे नाव | प्रतिबिंबित पाठ |
|---|---|---|
| १· | सहकाऱ्याबद्दल प्रेम | शाळेचा पहिला दिवस |
| २· | बंधुभाव | आमचे सोबती |
| ३· | मित्रप्रेम | अशी आमुची मुले |

सारणी क्रमांक ४·४ पुढे चालू ····

| अ·नं· | मूल्याचे नांव | प्रतिबिंबित पाठ |
|---|---|---|
| ४· | भूतदया | हंस कोणाचा ? |
| ५· | जिव्हाळा | कोणासाठी ? बाळासाठी |
| ६· | सहभावना | मित्रप्रेम |
| ७· | शेजारधर्म | |
| ८· | सहानुभूती | |
| ९· | मातृप्रेम | |
| १०· | निसर्गप्रेम | आनंदाने गाऊ या |
| ११· | निसर्ग परिचय | उघड पावसा, चल ग सई |
| १२· | प्रसंगावधान | हुषार कावळा, धाडसी फेलिसिटा |
| १३· | युक्ती श्रेष्ठत्व चातुर्य | हुषार कावळा, पुरी हौस फिटली |
| १४· | यंत्राबद्दल आवड | इंजिनदादा |
| १५· | स्वावलंबन | माकडाचे घर, कुंभाराची कला |
| | उद्योग प्रियता | असे आमचे गाडगेबाबा |
| १६· | स्वच्छता | माझा खाऊ मला द्या |
| | समाजसेवा | कुंभाराची कला |
| | श्रमप्रतिष्टा | असे आमचे गाडगेबाबा |
| १७· | जिज्ञासा,सारासार विचार, कल्पना शक्तीचा विकास | सांग ना आई, ऐकावे तरी कोणाचे ? एकीचे बळ इच्छा· |
| १८· | सामाजिक शिष्टाचार | गोगलबाई बारशाला जातात, आईस पत्र, पाहुणे· |

सारणी क्रमांक ४·४ पुढे चालू ···

| अ·नं· | मूल्याचे नांव | प्रतिबिंबित पाठ | मूल्य पट्ट |
|---|---|---|---|
| १९· | आत्मविश्वास, ग्रामीण जीवनाबद्दल आवड, प्रयत्नाने सर्व साध्य होते· | सुगीचे दिवस<br>देह अपंग मन अभंग | |
| २०· | प्रामाणिकपणा, राष्ट्रपुरुषाबद्दल प्रेम | मला शाबासकी नको· | |
| २१· | विनोद व मनोरंजन | विदुषक, पुरी हौस फिटली | |
| २२· | विज्ञानाबद्दल आवड, संशोधकाबद्दल आदर | वाफेची शक्ती | |

इयत्ता २ री च्या पाठयपुस्तकातून वरील सारणी क्रमांक ४·४ नुसार मूल्ये प्रतिबिंबित होतात असे आढळून येते· त्यामध्ये प्रामुख्याने खालील मूल्यांचा अधिक प्रभाव आढळतो·

प्रेमभावना, सहकार्य, जिव्हाळा, साहस, जिज्ञासा, स्वच्छता, सारासार विचार, सहानुभूती , निसर्ग परिचय, स्वावलंबन, समाजसेवा, सामाजिक शिष्टाचार, विनोद, मनोरंजन, आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, राष्ट्रपुरुषाबद्दल प्रेम, कल्पनाशक्ती विकास, विज्ञानाची आवड, प्रसंगावधान, चातुर्य , यंत्राबद्दल प्रेम इत्यादी मूल्ये प्रामुख्याने प्रतिबिंबित होतात·

## ४·४ "बालभारती पाठयपुस्तक तिसरे" या पाठयपुस्तकाचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण :

सदर पाठयपुस्तकात गद्य व पद्य मिळून एकूण १२ पाठ आहेत. या प्रत्येक पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये खालील प्रमाणे आहेत.

सारणी क्रमांक ४·५

इयत्ता ३ रीच्या पाठयपुस्तकातील पाठामधून प्रतिबिंबित झालेली मूल्ये

| पाठ क्रमांक | पाठाचे नांव | प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| १. | जमाडी जंमत | कल्पनाशक्ती विकास |
| २. | तीन भावंडे | स्वच्छता |
| ३. | जिकडे तिकडे पाणीच पाणी | निसर्ग प्रेम, पाण्याचा उपयोग |
| ४. | कहाणी पावसाची | वृक्षसंवर्धन, जंगलाचे फायदे |
| ५. | तोडणे सोपे जोडणे अवघड | भूतदया |
| ६. | शाहू महाराज | बंधुभाव, सामाजिक बांधिलकी, अस्पृश्यता नष्ट करणे. |
| ७. | झुलेबाई झुला | मनोरंजन |
| ८. | मुलांची तक्रार | एकात्मता, विज्ञान दृष्टीची जोपासना |
| ९. | ईद मुबारक | सर्व धर्म समभाव |
| १०. | घाटातली वाट | निसर्गप्रेम |
| ११. | चतुर बकरी | चातुर्य |
| १२. | जिद्द | उद्योगशिलता, महत्वाकांक्षा |

सारणी क्रमांक ४·५ पुढे चालू ····

| पाठ क्रमांक | पाठाचे नांव | प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| १३· | सोन्याची जांभळे | विज्ञाननिष्ठा, अंधश्रध्दा निर्मूलन |
| १४· | ते अमर हुतात्मे झाले | देशप्रेम, ध्येयनिष्ठा· |
| १५· | प्रकाश, प्रकाश | धैर्य |
| १६· | आईचे पत्र | थोरांबद्दल आदर |
| १७· | वासुदेव | मानवता |
| १८· | निशाण फडकले | सहकार, साहस |
| १९· | सेनापती बापट | देशप्रेम, त्याग, स्वच्छता· |
| २०· | कळी | कल्पनाशक्ती विकास, सौंदर्य दृष्टी वाढवणे· |
| २१· | मोठे मन | त्याग, बंधुभाव, सहानुभूती· |
| २२·२३· | चतुर बिरबल | चातुर्य |
| २४· | कोण गे आई ? | निसर्ग सौंदर्य आस्वाद· |
| २५· | गाव तिथ गोबर गॅस | परिश्रमशिलता, विज्ञानाचे फायदे |
| २६· | इच्छा तिथ मार्ग | स्वावलंबन,आत्मविश्वास, विद्याप्रेम |
| २७· | सावित्रीबाई फुले | समाजसेवा, शिक्षणाचे महत्व |
| २८· | सोनुला | मातृप्रेम |
| २९· | तेलगेले, तूप गेले | शांतता, निर्णयशक्ती |
| ३०· | रविवारचा शोध | वक्तशीरपणा |
| ३१· | माकडवाला | भूतदया |
| ३२· | भाकरीची गोष्ट | कष्ट, कठोर परिश्रम |

इयत्ता तीसरीच्या बालभारती पाठयपुस्तकातील पाठांमधून वरील सारणी क्रमांक ४·५ नुसार मूल्ये प्रतिबिंबित होतात· एकच मूल्य एकापेक्षा अन्य

पाठामधूनही प्रतिबिंबित होत असल्यामुळे मूल्यांनुसार पाठांची यादी पुढे दिलेली आहे. या यादी मध्ये मूल्य व ते मूल्य ज्या पाठांमधून प्रतिबिंबित होते अशा पाठांची नावे दिलेली आहेत. त्यामुळे इयत्ता तिसरीच्या पाठयपुस्तकातून नेमकी किती व कोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात हे समजून येवू शकेल.

सारणी क्रमांक ४.६

मूल्यांवर आधारित पाठांचे केलेले वर्गीकरण

| अ.नं. | मूल्याचे नांव | प्रतिबिंबित पाठ |
|---|---|---|
| १. | चातुर्य | चतुर, बकरी, चतुर बिरबल |
| २. | कल्पनाशक्ती विकास | जमाडी जंमत , कळी |
| ३. | सौंदर्यदृष्टी विकास | कळी, कोण गे आई |
| ४. | स्वच्छता | तीन भावंडे, सेनापती बापट |
| ५. | निसर्गप्रेम | जिकडे तिकडे पाणीच पाणी, घाटातली वाट, कोण गे आई. |
| ६. | वृक्षसंवर्धन | कहाणी पावसाची |
| ७. | भूतदया | तोडणे सोपे जोडणे अवघड, माकडवाला |
| ८. | बंधुभाव | मोठे मन, शाहु महाराज |
| ९. | सर्वधर्म समभाव, एकात्मता. | ईद मुबारक, मुलांची तक्रार |
| १०. | थोराबद्दल आदर | आईचे पत्र |
| ११. | मानवता | वासुदेव |
| १२. | सामाजिक बांधिलकी | शाहु महाराज, सावित्रीबाई फुले |
| १३. | मनोरंजन | झुले बाई झुला |

सारणी क्रमांक ४·१ पुढे चालू ···

| अ·नं· | मूल्याचे नाव | प्रतिबिंबित पाठ |
|---|---|---|
| १४· | परिश्रम/उद्योगशिलता | जिद्द, गाव तिथ गोबर गॅस भाकरीची गोष्ट |
| १५· | विज्ञान निष्ठा/ फायदे | सोन्याची जांभके, गाव तिथ गोबर गॅस, मुलांची तक्रार |
| १६· | स्वावलंबन | इच्छा तिथ मार्ग |
| १७· | साहस | प्रकाश, प्रकाश, निशाण फडकले |
| १८· | देशप्रेम | ते अमर हुतात्मे झाले, सेनापती बापट |
| १९· | मातृप्रेम | सोनुला |
| २०· | आत्मविश्वास | इच्छा तिथे मार्ग |
| २१· | शिक्षणाचे महत्व | सावित्रीबाई फुले, इच्छा तिथे मार्ग |
| २२· | अंधश्रध्दा निर्मूलन | सोन्याची जांभके |
| २३· | सहकार्य | निशाण फडकले |
| २४· | वक्तशीरपणा | रविवारचा शोध |
| २५· | महत्वाकांक्षा | जिद्द |
| २६· | सहानुभूती | मोठे मन |
| २७· | निर्णयशक्ती | तेल गेले तूप गेले |
| २८· | (शांतता)धांदरटपणा न करणे· | तेल गेले तूप गेले |

मूल्यानुसार पाठांचे वर्गीकरण केले असता वरील मूल्ये प्रतिबिंबित होतात असे आढळून येते·

## ४·५ " बालभारती पाठ्यपुस्तक चौथे " या पाठ्यपुस्तकाचे मूल्याच्या दृष्टिकोनातून विश्लेषण :

बालभारती मराठी पुस्तक चौथे या पाठ्यपुस्तकात नऊ कवितांसह एकूण ३३ पाठ आहेत· गद्य पाठांपैकी एक नाटुकले " घाम हवा घाम " हे आहे· व दोन कथा आहेत· त्यापैकी एक जपानी लोककथा " झाडाची माया " ही आहे· या पाठ्यपुस्तकातील पाठांमधून खालीलप्रमाणे मूल्ये प्रतिबिंबित झालेली आढळून येतात·

सारणी क्रमांक ४·७

इयत्ता ४ थीच्या पाठ्यपुस्तकातील पाठातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये

| पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| १· | पाहुणा गोजिरा | वृक्षारोपन, वृक्ष संवर्धन |
| २· | वात्सल्य | ममता, वात्सल्य |
| ३· | झाडाची माया | वृक्षारोपन, ममता,वात्सल्य |
| ४· | चला चंद्रावर | वैज्ञानिक शोधांबद्दल आवड |
| ५· | निर्धार | निश्चय, निर्धार |
| ६· | लोकमान्य टिळक | थोरांबद्दल आदर |
| ७· | भूमिगत | मातृभूमी प्रेम |
| ८· | आमचा खंड्या | पशुबद्दल प्रेम |
| ९· | धीवर पक्षी | पक्षांबद्दल प्रेम |
| १०· | झोप | अतिरेक उपहासास पात्र होतो· |
| ११· | असे झुंजले वायुपुत्र | सैन्याबद्दल आदर |
| १२· | जीवघेणा प्रसंग | श्रमप्रतिष्ठा,संकटसमयी इतरांना मदत करावी· |

सारणी क्रमांक ४·७ पुढे चालू ···

| पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| १३· | इथे | निसर्ग सौंदर्य ओढ |
| १४· | नवा वसा | मानवता, श्रमप्रतिष्ठा |
| १५· | आभाळाचा निरोप | निसर्गप्रेम |
| १६· | वंदे मातरम् | त्याग |
| १७· | भाऊबीज | बंधुप्रेम |
| १८· | पंडीत नेहरु एक पुरुषोत्तम | मातृभूमी प्रेम |
| १९· | शिका-यातून जलविहार | प्रवासातून ज्ञान मिळते· |
| २०· | घाम हवा घाम | माणुसकी , श्रमप्रतिष्ठा |
| २१· | ऋतुराजाची चाहूल | निसर्ग प्रेम |
| २२· | पुस्तकांच्या सहवासात | दीर्घोद्योग, वाचनातून ज्ञान व आनंद मिळतो· |
| २३· | आसू आणि हसू | आपले दु:ख बाजूस ठेवून इतरांना आनंद द्यावा· |
| २४· | रक्तदान नव्हे जीवदान | रक्तदान महत्व, सेवाभाव, एकता, |
| २५· | कष्टे वीण फळ नाही | स्वावलंबन, परिश्रमाचे महत्व |
| २६· | सर्वस्वाचा त्याग | राष्ट्रभक्ती, राष्ट्रत्यागी वृत्ती· |
| २७· | माझी आई बहिणाई | मातृप्रेम |
| २८· | पतंग | क्रीडाप्रेम |
| २९· | आंब्याचा मोहर | वृक्षासंबंधी प्रेमभावना· |
| ३०· | एक अपघात | मुलांप्रमाणे निष्पाप वागणारी मोठी माणसे सर्वांना आवडतात· |

सारणी क्रमांक ४·७ पुढे चालू ····

| पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| ३१· | एक आगळी जत्रा | अंधश्रध्दा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन रूजवणे· |
| ३२· | संतवाणी | संताबद्दल आदर, परोपकार |
| ३३· | जावईबुवांची गोष्ट | विनोदातून आनंदप्राप्ती |

इयत्ता ४ थीच्या पाठयपुस्तकातील पाठांमधून वरील सारणी क्र·४·७ नुसार मूल्ये प्रतिबिंबित होतात असे आढळून आले· परंतु कांही पाठांमधून एकपेक्षा अधिक मूल्ये प्रतिबिंबित होतात तर एकच मूल्य विविध पाठांमधून प्रतिबिंबित होत असल्याचे आढळून आल्याने मूल्यांनुसार पाठाची विभागणी करणे आवश्यक वाटल्याने मूल्यानुसार पाठांची विभागणी खालील प्रमाणे केलेली आहे·

सारणी क्रमांक ४·८

मूल्यांवर आधारित पाठांचे केलेले वर्गीकरण

| अ·नं· | मूल्याचे नाव | प्रतिबिंबित पाठ |
|---|---|---|
| १· | वृक्षारोपन | पाहुणा गोजिरा, झाडाची माया |
| २· | वृक्षासंबंधी प्रेमभावना | आंब्याचा मोहर |
| ३· | निसर्ग सौंदर्य ओढ | इथे, ऋतुराजाची चाहूल, |
| | निसर्गप्रेम | आभाळाचा निरोप |
| | संताबद्दल आदर | संतवाणी |
| ३· | वात्सल्य, ममता | वात्सल्य, माझी आई बहिणाबाई |
| ४· | बंधुप्रेम | भाऊबीज |

सारणी क्रमांक ४·८ पुढे चालू ····

| अ·नं· | मूल्याचे नांव | प्रतिबिंबित पाठ |
|---|---|---|
| ५· | मातृभूमी प्रेम | पंडीत नेहरु एक पुरुषोत्तम<br>भूमिगत |
| ६· | राष्ट्रभक्ती, राष्ट्रत्याग | वंदे मातरम्, सर्वस्वाचा त्याग |
| ७· | पशु पक्षांबद्दल प्रेम | आमचा खंडया, धीवर पक्षी |
| ८· | श्रमप्रतिष्ठा | नवा वसा, घाम हवा घाम,<br>जीव घेणा प्रसंग |
| ९· | माणुसकी | नवा बसा, घाम हवा घाम |
| १०· | वैज्ञानिक दृष्टिकोन,<br>वैज्ञानिक शोधाबद्दल<br>आवड, | चला चंद्रावर, |
| | अंधश्रध्दा निर्मूलन | एक आगळी जत्रा, संतवाणी |
| ११· | दृढनिश्चय | निर्धार |
| | प्रयत्नाने यश मिळते | निधार |
| १२· | धैर्याने संकटास सामोरे<br>जाणे· | जीवघेणा प्रसंग |
| १३· | अतिरेक उपहासास<br>पात्र होतो· | झोप |
| १४· | विनोदातून आनंद-<br>प्राप्ती होते· | जावाईबुवांची गोष्ट |
| १५· | राष्ट्राभिमान | असे झुंजले वायुपुत्र |
| १६· | सैन्याबद्दल आदर | असे झुंजले वायुपुत्र |
| १७· | शौर्य, धैर्य | असे झुंजले वायुपुत्र |
| १८· | प्रसंगावधान | असे झुंजले वायुपुत्र |

सारणी क्रमांक ४·८ पुढे चालू ····

| अ·नं· | मूल्याचे नांव | प्रतिबिंबित पाठ |
|---|---|---|
| १९· | प्रवासातून ज्ञान मिळते | शिका-यातून जलविहार |
| २०· | वाचनातून ज्ञान व आनंद मिळतो | पुस्तकांच्या सहवासात |
| २१· | परिश्रम, दीर्घोद्योग | आसू आणि हसू, असे झुंजले वायुपुत्र, पुस्तकांच्या सहवासात, कष्टे विण फळ नाही· |
| २२· | निरपेक्षवृत्ती | रक्तदान नव्हे जीवदान |
| २३· | सेवाभाव | संतवाणी, रक्तदान नव्हे जीवनदान |
| २४· | रक्तदान महत्व | -"- |
| २५· | एकता | -"- |
| २६· | स्वावलंबन | कष्टे विण फळ नाही· |
| २७· | क्रीडाप्रेम | पतंग |
| २८· | मुलांप्रमाणे निष्पाप वागणारी मोठीमाणसे सर्वांना आवडतात· | एक अपघात |
| २९· | परोपकार | संतवाणी |

वरील सारणी क्रमांक ४·८ नुसार मूल्यांची यादी केली असता इयत्ता ४ थीच्या पाठयपुस्तकातील पाठांमधून एकोणतीस मूल्ये प्रतिबिंबित होतात असे आढळून येते·

४·६ <u>समारोप</u> :

या प्रकरणामध्ये संशोधनासाठी निवडलेल्या बालभारती पुस्तक इयत्ता पहिली ते इयत्ता चौथी च्या मराठी विषयाच्या पाठयपुस्तकातील पाठांमधून

प्रतिबिंबित होणा-या मूल्यांच्या संदर्भात चर्चा करून मूल्यांची निश्चिती केलेली आहे. प्रत्येक इयत्तेतील पाठांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये व त्यांची इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या प्रत्येक इयत्तेतील संख्या व त्यांची नावे आदी निश्चित केलेले आहे. पुढील प्रकरणामध्ये प्रश्नावली, मुलाखती व निरीक्षणाद्वारे गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करून या विश्लेषणावर आधारित अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे.

=0=0=0=0=0=